**वादीचा सा.क्र. १ चा सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. कर्पे यांच्यामार्फत शपथेवर सुरू-:-**

१. माझे शपथपत्र नि.क्र. ९८ मधील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे व तो वाचून मी त्यावर स्वाक्षरी केली आहे.

२. मी शपथपत्रासह खालील कागदपत्रे दाखल केलेले आहेत.

१. गट क्र. ४३३ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **निशाणी क्र. ४८**
२. गट क्र. ४३१ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **निशाणी क्र. ४९**
३. गट क्र. ४३४ च्या ७/१२ ची प्रमाणित प्रत **निशाणी क्र. ५०**
४. दि. २९/०३/२०१२ रोजी तहसिलदार यांनी दिलेल्या अर्जाची प्रमाणित प्रत **निशाणी क्र. १०४**
५. फोटो वस्तु **'अ' व 'ब'**

सरतपास पुर्ण.

**उलटतपासणी प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. कदम यांच्यामार्फत :-**

३. गट क्र. ४३३ हा पुर्वी आमची आजी सरुबाई पाटीलबा कर्पे यांचे नावे होता. सदर मिळकत आजरोजी शुभम ज्ञानदेव कर्पे यांच्या नावे सरुबाई यांनी मृत्युपत्राआधारे करून दिली. आता सदर साक्षीदारास सन २०२२-२३ चा गट क्र. ४३३ चा उतारा दाखवण्यात आला, त्यास **निशाणी क्र. १०५** देण्यात येतो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३३ चा माझा कुठलाही संबंध नाही. प्रस्तुत दाव्यात माझी आजी सरुबाई वारल्यानंतर वारस म्हणून आमची नावे दाव्याच्या अभिलेखावर आली. गट क्र. ४१२/२ हा शुभम ज्ञानदेव कर्पे व ज्ञानदेव गंगाधर कर्पे यांनी खरेदीने घेतलेला आहे. गट क्र. ४१२/२ पैकी ८० गुंठे क्षेत्र मी खरेदी केलेला आहे. आता सदर साक्षीदारास गट क्र. ४१२/२ चे खरेदीखत क्र. १५८६/२००० ची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली, त्यास **निशाणी क्र. १०६** देण्यात येते. सदर खरेदीखतातील चतु:सिमा बरोबर आहे. तर गट क्र. ४१२/२ मधील राहिलेले ८३ गुंठे क्षेत्र आमची आजी सरुबाई यांच्या नावे

घेतले होते. आता सदर साक्षीदारास गट क्र. ४१२/२ मधील ८३ गुंठे क्षेत्राचे खरेदीखत क्र. १५८७/२००० ची प्रमाणित प्रत दाखवण्यात आली, त्यास **निशाणी क्र. १०७** देण्यात येते. गट क्र. ४३२ मधील विहीर ही सरुबाई व इतर प्रतिवादी यांची सामाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३२ मधील विहिरीवर जाण्यासाठी सरूबाई व इतर प्रतिवादी हे सामाईक रस्त्याचा वापर करतात.

४. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३३ च्या पश्चिमेला उत्तर-दक्षिण असा टाकळीमिया-तांदुळवाडी असा जुना रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३१ च्या पुढे टाकळीमिया-तांदुळवाडी रस्ता सुरू आहे. हे म्हणणे खरे नाही की, टाकळीमिया-तांदुळवाडी रस्ता हा आमच्या गट क्र. ४३३ च्या रस्त्याला जोडलेला आहे. गट क्र. ४३३ च्या दक्षिणेला प्रतिवादी क्र. ६ यांचा गट क्र. ४३४ व ४३१ आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३२ मध्ये जाण्यासाठी गट क्र. ४३४ व ४३१ मधील धारकांनी सहा फुटाचा रस्ता सोडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३३ मधुन सुध्दा एक चकारी गट क्र. ४३२ च्या वहिवाटी सोडलेली आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३३ मधुन असलेला रस्ता आम्ही बंद केला म्हणून प्रतिवादी यांनी तहसिलदार यांच्याकडे रस्त्यासाठी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर रस्ता केस प्रकरणात माझी आजी सरूबाई व मला नोटीस प्राप्त झाली होती व त्यामध्ये आम्ही हजर होवून आमचे म्हणणेही मांडले. सदर प्रकरणामध्ये तहसिलदार हे घटनास्थळी पाहणी पंचनाम्यासाठी आले होते. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार यांनी सदर पंचनाम्यात घटनास्थळी रस्त्याची मोडतोड झाल्याची दिसून आले. हे म्हणणे खरे नाही की, तहसिलदार यांना घटनास्थळी रस्त्याची मोडतोड झाल्याचे दिसून आल्याने त्यांनी आमचेविरूध्द एकतर्फा आदेश पारित केला. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त रस्त्याच्या बदल्यात गट क्र. ४३२ वाल्यांनी आम्हाला जमीन काढून दिली. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन ही आमच्या गट क्र. ४३३ च्या लगत

गट क्र. ४३२ मधून दिली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही प्रतिवादींचा रस्ता मोडला व त्यांची वाहतूक बंद केली म्हणून आमचेत खरा वाद निर्माण झाला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजीही प्रतिवादी यांची वहिवाट आमच्या गट क्र. ४३३ च्या दक्षिण बाजुने दक्षिणोत्तर चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३२ वाल्यांचा आडवला म्हणून ते आम्हाला जमीन विकतील म्हणून त्या कारणे आम्ही रस्ता आडवला. हे म्हणणे खरे नाही की, वादग्रस्त रस्त्याशिवाय प्रतिवादी यांना त्यांच्या गट क्र. ४३२ मध्ये जाण्यासाठी कुठलाही पर्यायी रस्ता नाही.

६. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३३ हा सरूबाई यांचा वडिलोपार्जित नसून खरेदीचा आहे. गट क्र. ४३३ ची गेल्या ३० वर्षात कधीही सरकारी मोजणी झालेली नाही व केलेली देखील नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. ४३३ च्या पश्चिमेला असलेला रस्ता दिसू नये म्हणून आम्ही त्याची सरकारी मोजणी केली नाही. प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांच्या गट क्र. ४३१ व ४३४ या जमिनीची मोजणी केल्याची मला कल्पना नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आजी सरुबाई हिला पुढे करून आम्ही प्रतिवादीविरूध्द प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करून आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2025.11.18 16:07:43 +0530

(मयुर ए. पवार)

दिनांक:-१८/११/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.